**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-३**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-२६/४/२०१२

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.३ सोमवार दि.३०/४/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**सोमवार दिनांक-३०/४/२०१२ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ९ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १७ बुधवार दिनांक २१/०३/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| १० | मदरसा तर्फे मुल्ला अताउर रहेमान अब्दुल गफफार (ट्रस्टी), रा. इस्लामिया बेकरी समोर मुकुंदनगर यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन मार्च२०१२ अखेर ( वॉर्ड क्र.८८ बील क्रमांक ८८१) पाणीपटटी रूपये ९,०००/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११ | श्री. कल्याण क. खंडलेवाल रा. घर नं. १९३६,नालबंद खुंट,अ.नगर यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००९-२०१२ अखेर (वॉर्ड क्र. ५ बील क्रमांक ४६१ ) पाणीपट्टी रूपये २६,०३०/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२ | सचिव, तारकपूर असोसिएशन ट्रस्ट ,ख्रिश्चन कॉलनी, तारकपूर,अ.नगर यांचे सार्वजनिक नळ कनेक्शन नसतांना आकारणी केलेली सन २००४-२०१० अखेर (वॉर्ड क्र. ४२ बील क्रमांक ४०८ ) पाणीपट्टी रूपये ३७,१७८/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १३ | अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पदांवर अटी व शर्ती नुसार केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

...२

| | |
|---|---|
| १४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये विविध ठिकाणी टॅन्कर्सद्वारे पाणी पुरवठा करणेकामी सन २०१२-२०१३या आर्थिक वर्षासाठी (जिपीएस सिस्टिमसह) मागविण्यांत आलेल्या निविदा व याकामी येणारे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ. |
| १५ | अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत कामांसाठी पी.एम.सी. नेमणूकीची करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १६ | अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गोविंदपुरा ते कॅन्टोनमेंट नाल्यापर्यंतच्या रस्त्याच्या बाजुने पावसाचे पाणी जाण्यासाठी आर.सी.सी. पाईप गटर करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १७ | अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नगर-पुणे रस्त्यावरील केडगांव रेल्वे उड्डान पुल ते केडगांव रेणुका देवी मंदिरापर्यत रस्त्याचे पुलाच्या कामासह रूंदीकरण करून कॉक्रीटीकरणासह डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १८ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५ मधील स.नं. ६४ सावेडी येथील ओपन स्पेसमध्ये थिम पार्क (आरोग्य पार्क) निर्माण करणेकामी मा.जिल्हा नियोजन समिती ,अहमदनगर यांचेकडे नाविन्य पुर्ण योजने अंतर्गत प्रस्ताव पाठविणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १९ | अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी डॉ. सौ. कांचन सुरेंद्र रच्चा यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी दरमहा मानधनामध्ये वाढ करून करारबध्द नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्र. ९ - मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१७ बुधवार दिनांक २१/०३/२०१२ रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- १० ते १९ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ३**

विषय क्रमांक-९ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

ठराव क्रमांक-९ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १७ बुधवार दिनांक २१/०३/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १७ बुधवार दिनांक २१/०३/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले. सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभा दिनांक २१/०३/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. गायकवाड नि.व.:-मागील सभा दिनांक २१/०३/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-मा.स्थायी समिती सभा दि.२१/३/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठरावः-</u>** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १७ बुधवार दिनांक २१/०३/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

अनुमोदक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-३**

विषय क्रमांक-१० सोमवार दिनांक ३०/४/२०१२

ठराव क्रमांक-१० सोमवार दिनांक ३०/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** मदरसा तर्फे मुल्ला अताउर रहेमान अब्दुल गफफार (ट्रस्टी), रा. इस्लामिया बेकरी समोर मुकुंदनगर यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन मार्च२०१२ अखेर ( वॉर्ड क्र.८८ बील क्रमांक ८८१) पाणीपटटी रूपये ९,०००/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा प्रभाग समिती क्र.३ झेंडीगेट जा.क्र. दि.४/२/२०१२

विषय- नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीचे बील आल्याबाबत.

संदर्भ :- मदरसा तर्फे मुल्ला अताउर रहेमान अब्दुल गफफार (ट्रस्टी) यांचा
दिनांक १६/१/२०१२ रोजीचा अर्ज.

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री.मदरसा तर्फे मुल्ला अताउर रहेमान अब्दुल गफफार (ट्रस्टी) रा. इस्लामिया बेकरी समोर, मुकुंदनगर यांनी इकडेस अर्ज देवुन विनंती केलेली आहे की, सदर ओपन प्लॉटला नळ कनेक्शन नसतांनाही सदर घराला सन २००६-०७ पासुन अचानक पाणीपटटी आकारून प्रथमच सन २००९-२०१२ मध्ये बील देण्यांत आलेले आहे. सदर ठिकाणची समक्ष पाहणी करून सदरचे चुकीचे बील रद्द करण्यांत यावे अशी विनंती केलेली आहे.

वॉर्ड क्र.८८ बील क्र. ८८१ वर मदरसा चा ओपनप्लॉट असुन त्यांच्या नावे सन मार्च २०१२ अखेर घरपट्टी रू.४४४७/- व पाणीपट्टी रू.९०००/- असे दोन्ही मिळुन रू.१३४४७/- इतकी थकबाकी आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल प्रभाग समिती क्र.३ झेंडीगेट मधील पाणीपुरवठा फिटर श्री. पाचारणे यांना सादर करणेबाबत सांगितले असता त्यांनी मदरसा वरील ओपनप्लॉट ची दिनांक ३०/१/२०१२ रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन येत नाही, अस्तित्वात नाही या बाबतचा अहवाल दिनांक १/२/२०१२ रोजी इकडेस सादर केलेला आहे.

सन ०३/०४मध्ये माजी सैनिक यांच्या संस्थेने महानगरपालिकेतील हद्दीतील अनाधिकृत पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शनचे सर्वेक्षण चुकीच्या पध्दतीने केल्याचे आढळते.

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री.पाचारणे यांच्या अहवालानुसार चुकून लागलेली पाणीपट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार पाणीपट्टीचे बील रद्द करणे संयुक्तीक वाटते. सबब आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक / मदतनीस वॉर्ड क्र.८८ यांचा अहवाल असे.

एच.आर.सय्यद :- सादर, सदर ठिकाणी समक्ष पहाणी केली असता वरील ठिकाणी नळ कनेक्शन नाही.

प्रभाग अधिकारी :- सादर, तपासुन पुढील योग्य ला कार्यवाहीसाठी

मा.सहा. मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी :- प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.३ सदरचे प्रकरण मा.आयुक्त साहेब यांनी नेमलेल्या पाहणी कमिटी पुढे सादर करा.

मु.ले.प.:- सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी हयांचे अभिप्रायानुसार पुढील आदेशार्थ सादर.

मा.उपायुक्त (कर) :- पाहणी समिती अहवालानुसार प्रस्ताव मंजुरीसाठी मा.स्थायी समिती ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.३१/३/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब : मदरसा तर्फे मुल्ला अताउर रहेमान अब्दुल गफफार यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- नळ कनेक्शन नसतांना आलेली पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबतचे विषय मुकुंदनगर भागातीलच नागरीकांचे अर्ज का येतात. ग्रामपंचायती नंतर सदरचा भाग महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट झालेला आहे. नळकनेक्शन बाबत झालेला सर्वे चुकीचा झालेला आहे. त्याठिकाणी पुन्हा सर्व्हे करण्यांत यावा.

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- नळकनेक्शन नसतांना पाणीपट्टीचे बिल गेल्याबाबत व ती निर्लेखित करणे बाबत संबंधितांचे अर्ज आलेले आहेत. त्यांचेकडुन मागील थकबाकी भरुन घेणे योग्य वाटते.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- नळकनेक्शन नसतांना पाणीपट्टीची बिले गेली कशी ?

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडमः- नळकनेक्शन नसल्या बाबत ज्या वर्षी संबंधितांचा अर्ज आलेला असेल तेंव्हापासुन त्यांची पाणीपट्टी निर्लेखित होणे आवश्यक आहे.

मा.श्री.समद खान :- मुकुंदनगर भागातील नागरीकांना सन २०१० चे पाणीपट्टीचे बिले आलेली आहेत. त्यांना यापुर्वी ५-६ वर्ष बिले गेलेली नाहीत. संबंधितांना बिले पाठवुन त्यांनी बिले भरली नाही तर ती त्यांची संबंधितांची चूक आहे. प्रत्येक वर्षी पाणीपट्टीचे बिल गेल्यास आणि संबंधितांनी ते प्रत्येक वर्षी भरलेले नसल्यास त्यांना माफ करु नका.

मा.श्री. सातपुते दि.ना.:-विषय क्र. १० ते १२ चा ऑफिस रिपोर्टानुसार मंजूर करावा.

मा.सौ. गंधे सु.मो.- विषय क्र. १० ते १२ चा ऑफिस रिपोर्टानुसार मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- विषय क्र. १० ते १२ चा ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-**मदरसा तर्फे मुल्ला अताउर रहेमान अब्दुल गफफार (ट्रस्टी), रा. इस्लामिया बेकरी समोर मुकुंदनगर यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन मार्च२०१२ अखेर ( वॉर्ड क्र.८८ बील क्रमांक ८८१) पाणीपटटी रूपये ९,०००/-(रूपये नउ हजार फक्त) चे बील निर्लेखित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमनताई मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-३**

विषय क्रमांक-११ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

ठराव क्रमांक-११ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. कल्याण क. खंडलेवाल रा. घर नं. १९३६,नालबंद खुंट,अ.नगर यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००९-२०१२ अखेर (वॉर्ड क्र. ५ बील क्रमांक ४६१ ) पाणीपट्टी रूपये २६,०३०/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा प्रभाग समिती क्र.३ झेंडीगेट जा.क्र. दि.१३/५/२०१०

विषय- नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीचे बील आल्याबाबत.

संदर्भ :- श्री. कल्याण क. खंडेलवाल यांचा दिनांक ३१/३/२०१० रोजीचा अर्ज.

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री.कल्याण क. खंडेलवाल, रा. नालबंद खुंट घर नं.१९३६,अ.नगर यांनी इकडेस अर्ज देवुन विनंती केलेली आहे की, सदर घराला नळ कनेक्शन नसतांनाही सदर घराला सन २०१० पासुन अचानक पाणीपटटी आकारून प्रथमच सन २००९-२०१० मध्ये अचानक पाणीपट्टीची आकारणी करून बील देण्यांत आलेले आहे. सदर ठिकाणची समक्ष पाहणी करून सदरचे चुकीचे बील रद्द करण्यांत यावे अशी विनंती केलेली आहे.

वॉर्ड क्र.५ बील क्र. ४६१ वर श्री. कल्याण क. खंडेलवाल यांची मिळकत असुन त्यांच्या नावे सन२००९-२०१२ अखेर घरपट्टी रू. वसुल व पाणीपट्टी रू.२६,०३०/- असे दोन्ही मिळुन रू.२६,०३०/- इतकी थकबाकी आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल प्रभाग समिती क्र.३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री.ससाणे यांना सादर करणेबाबत सांगितले असता त्यांनी श्री. कल्याण क. खंडेलवाल रा. नालबंद खुंट घर नं.१९३६ यांच्या घराची नळ कनेक्शनची दि.३१/३/२०१०रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळकनेक्शन आढळुन येत नाही, अस्तित्वात नाही या बाबतचा अहवाल दिनांक ३१/३/२०१०रोजी इकडेस सादर केलेला आहे.

सन २००३मध्ये माजी सैनिक यांच्या संस्थेने महानगरपालिकेतील हद्दीतील अनाधिकृत पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शनचे सर्वेक्षण चुकीच्या पध्दतीने केल्याचे आढळते.

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री.ससाणे यांच्या अहवालानुसार चुकून लागलेली पाणीपट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार पाणीपट्टीचे बील रद्द करणे संयुक्तीक वाटते. सबब आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक / मदतनीस वॉर्ड क्र.५ यांचा अहवाल असे.

करनिरीक्षक :-वसूली लिपिक व नळ जोड फिटर यांच्या अहवालाचे अवलोकन केले.सन१९९५-९६चे वसूली अभिलेख पाहता,नळजोड नसल्याचे दिसून येते तसेच सन२००३-०४मध्ये माजी सैनिक संस्थेने केलेल्या अनाधिकृत सर्व्हेक्षणामध्ये चुकीच्या नोंदी घेतल्याचे दिसून येते. सबब मुं.प्रां. मनपा अधि.१९४९चे कलम१५२नुसार सदर पाणीपट्टी आकारणी रद्द करणे संयुक्तीक वाटते.

प्रभागअधिकारी :-वॉर्ड लिपिक/करनिरीक्षक यांचे रिपोर्टाचे व शे-याचे अवलोकन केले त्यावर सहमत

मा.स.क.मु.अ. :- श्री. झिने / चाफे तपासुन सादर करा.

मा.सहा.मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी:-प्रभाग अधिकारी प्र.क्र.-३,जा.क्र.साप्रवि-२११३ दि.२०/९/१०चे आदेशानुसार कार्यवाही करावी.

मु.ले.प.:- प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.३ तसेच सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी हयांचे अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

मा.उपायुक्त (कर) :- १] सध्या पाणी वापराचा स्त्रोत कोणता आहे ? २] चुकीची आकारणी करण्यास जबाबदार कर्मचारी कोण ?

वसुली लिपिक प्र.स.क्र-३ :- फेरसादर, विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, सध्या श्री. कल्याण कन्हैय्यालाल खंडेलवाल हे पाणी पिण्यासाठी शेजारील घरातुन वापर करीत आहे.

तसेच सन २००३-०४ या वित्तीय वर्षामध्ये माजी सैनिक संस्थेकडून नळ कनेक्शन अनाधिकृत नळ कनेक्शन शोधणेची मोहिम राबविण्यांत आलेली होती. सदर मोहिमेमध्ये श्री. खंडेलवाल यांच्या मिळकतीमध्ये अनाधिकृत नळ कनेक्शन दाखविलेले असल्याने संगणकावर सन २००३ पासून पाणीपट्टी आकारणी करण्यांत आलेली आहे मात्र त्यावेळेस श्री. खंडेलवाल यांच्याकडे नळ कनेक्शन नव्हते.तरी पाणीपट्टी रू.२६०३०/- इतकी रक्कम निर्लेखित करणे उचित वाटते, तथापि आदेशार्थ सादर. **/अ**

कर निरीक्षक :- सहमती दर्शक सही

प्रभाग अधिकारी :- सादर **"अ"** सहमत

मा.उपायुक्त (कर) :- सोबत जोडलेल्या पाहणी अहवालानुसार व अ नुसार मा.स्थायीसमिती कडे पुढील आदेशार्थ पाठविण्यास्तव मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.३१/३/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>ठराव</u>:-**श्री. कल्याण क. खंडलेवाल रा. घर नं. १९३६,नालबंद खुंट,अ.नगर यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००९-२०१२ अखेर (वॉर्ड क्र. ५ बील क्रमांक ४६१ ) पाणीपट्टी रूपये २६,०३०/- (रूपये सव्वीस हजार तीस फक्त ) चे बील निर्लेखित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमनताई मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-३**

विषय क्रमांक-१२ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

ठराव क्रमांक-१२ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-**सचिव, तारकपूर असोसिएशन ट्रस्ट ,ख्रिश्चन कॉलनी, तारकपूर,अ.नगर यांचे सार्वजनिक नळ कनेक्शन नसतांना आकारणी केलेली सन २००४-२०१०अखेर (वॉर्ड क्र.४२ बील क्र.४०८)पाणीपट्टी रूपये ३७,१७८/-चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा प्रभाग समिती क्र.३ दि.२६/७/२०११

विषय- सार्वजनिक नळ नसतांना आलेली पाणीपट्टी रद्द करणेबाबत.

संदर्भ :-सचिव,तारकपूर असोसि.ट्रस्ट,अ.नगर यांचा दि.२५/७/२०१० व २२/७/२०११चा अर्ज

मा.सादर,

विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, तारकपूर असोसिएशन ट्रस्ट, तारकपूर या ठिकाणी म.न.पा. कडून सन २००४ पासून सार्वजनिक नळ आकारणी करण्यांत आलेली असून पाणीपट्टीची आकारणी व्यापारी दरानुसार केलेली आहे.

वरील प्रमाणे व्यापारी आकारणीनुसार सन २००४ ते मार्च २०१० अखेर पाणीपट्टीची थकबाकी रू.३७१७८/- इतकी दाखविण्यांत आलेली असून सदर रकमेचे बील ट्रस्टला दिलेले आहे.

परंतु ट्रस्टाचे म्हणण्यानुसार सदर ठिकाणी ३० ते ४० वर्षापासून सार्वजनिक नळ नाही व ट्रस्टच्या प्रत्येक मिळकत धारकांनी स्वतंत्र नळ कनेक्शन घेतलेले आहे व प्रत्येक घरमालक दरवर्षी स्वतंत्रपणे पाणीपट्टीचा भरणा करीत आहे.

त्यामुळे ट्रस्टला पुर्वीपासून सार्वजनिक नळाची आवश्यकता नव्हती व नाही.

तरी मनपाकडून आकारणी केलेली सार्वजनिक नळाची पाणीपट्टी समक्ष पाहणी करून रद्द करावी अशी ट्रस्टने विनंती केलेली आहे.

तरी वरीलबाबत काय कार्यवाही करावी आदेशार्थ रिपोर्ट सविनय सादर.

येणेप्रमाणे वॉर्ड लिपिक यांचा अहवाल असे.

--**--

प्रभाग अधिकारी :- पाणी पुरवठा लिपिक, वॉर्ड वसुली लिपिक व फिटर यांचे मार्फत संयुक्ती पहाणी करून अहवाल दयावा. (२ दिवसांत)

१] श्री. ढगे एव्हीट-लिपिक ,२] श्री. शेख एजाज-पा.पु.,३] श्री. सलील शेख- फिटर

वॉर्ड लिपिक :- मा.सादर, उपरोक्त प्रमाणे वेळोवळी मागणी करूनही पाणी पुरवठा फिटर यांचा रिपोर्ट मिळालेला नाही.

वॉर्ड लिपिक :- मा.सादर, विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, तारकपूर ट्रस्ट या ठिकाणी पाणी पुरवठा फिटर यांनी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी सार्वजनिक नळ बंद असेलबाबत रिपोर्ट दि.१८/८/२०११ दिला असून प्रभाग समिती क्र.३ चे प्रभाग अधिकारी कर निरिक्षक व वॉर्ड लिपिक यांनी एकत्रित पाहाणी केलेली आहे. सदर ट्रस्टला पूर्वीपासून सार्वजनिक नळ नसल्याचे दिसून आले त्यानुसार ट्रस्टने पूर्वीपासून केलेल्या मागणीनुसार सार्वजनिक नळाची आकारणी झालेली पाणी पट्टी रद्द करणे योग्य वाटते. तथापि आदेशार्थ रिपोर्ट सविनय सादर.

कर निरीक्षक :- सादर, लिपिक यांचे रिपोर्ट नुसार कारवाईस्तव सादर.

प्रभाग अधिकारी :- सादर, सदर ठिकाणी समक्ष पहाणी केली असता पूर्वीचे असलेले सार्वजनिक नळ हे पूर्वीच तोडलेचे आढळले. परंतु सदरची नोंद त्यावेळेस पाणी पुरवठा विभागाकडून न आले कारणाने बाकी आढळून येते याबाबत सदरची नोंद संगणक /डिमांड व तस्तम रेकॉर्डवर घेउन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये सदर बाकी रू. ३७१७८/- (रू. सदतीस हजार एकशे अठयाहत्तर ) निर्लेखित करणे उचित वाटते.

सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी :- सदरचे प्रकरण मा.आयुक्त साहेब जा.क्र.साप्रवि २११३ दि.२०/९/२०१० अन्वये नियुक्त केलेल्या वरिष्ठ अधिका-याच्या कमेटी कडे सादर करण्यात यावा.

मुख्य लेखापरिक्षक :-सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी हयांचे अभिप्रायानुसार पुढील आदेशार्थ सादर.

मा.उपायुक्त (कर):-पाहणी समिती अहवाल व प्रस्तावानुसार पुढील आदेशार्थ विषय मा.स्थायी समिती पुढे पाठविणेस मंजुरीस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.४/४/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ठरावः-**सचिव, तारकपूर असोसिएशन ट्रस्ट ,ख्रिश्चन कॉलनी, तारकपूर,अ.नगर यांचे सार्वजनिक नळ कनेक्शन नसतांना आकारणी केलेली सन २००४-२०१०अखेर (वॉर्ड क्र.४२ बील क्र.४०८)पाणीपट्टी रूपये ३७,१७८/- (रूपये सदतीस हजार शंभर अठ्ठयाऐंशी फक्त)चे बील निर्लेखित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमनताई मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-३**

विषय क्रमांक-१३ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

ठराव क्रमांक-१३ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पदांवर अटी व शर्ती नुसार केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा आस्थापना विभाग जा.क्र. १२७ दि.९/४/२०१२

प्रस्तावना-विषय- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पदांवर अटी व शर्ती नुसार केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

सादर,

पाणी पुरवठा विभाग जा.क्र. १६५८ दि.१३/३/२०१२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवे करीता कंत्राटी करारानुसार तांत्रिक हुद्या प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात पदांवर दिनांक १०/१०/२०११ रोजी पासुन ६ महिन्याकरीता निर्देशित अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर नेमणूका करण्यांत आलेल्या आहेत. सदरची मुदत दिनांक १०/४/२०१२ रोजी पुर्वी संपुष्टात येणार आहे. पाणी पुरवठा विभागाकरीता मोठया प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने कंत्राटी करारानुसार नमुद तांत्रिक हुद्या प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात पदांवर कर्मचा-यांना नियमानुसार मुदतवाढ देणे / नियुक्ती करणे गरजेचे आहे." असे नमुद करून सुचित केलेले आहे.

सद्या उन्हाळयाचे दिवस असल्याने अहमदनगर शहरात व उपनगरात अत्यंत भिषण पाणी टंचाई निर्माण होत आहे व त्याबाबतच्या बातम्या वर्तमान पत्रामध्ये येत आहेत.

यापुर्वी पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवे करीता दर्शविलेल्या उमेदवारांची जा.क्र. आस्था./कंत्राटी कराबध्द नेमणूक १९६१ दिनांक ०४/१०/२०११ अन्वये दि.१०/१०/२०११पासुन सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केल्यानुसार दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेल्या होत्या.

सदरच्या अटी व शर्ती नुसार केलेल्या सहा महिन्याच्या कालावधीतील कंत्राटी करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत समाप्त होत होती.

उपरोक्त पाणी पुरवठा विषयक गंभीर परिस्थितीचा विचार होवुन पाणी पुरवठा विभाग जा.क्र. १६५८ दिनांक १३/३/२०१२ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार खालील तक्त्यांत दर्शविल्या प्रमाणे तांत्रिक खंड देवुन तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर अटी व शर्तीनुसार सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्त्या करण्यांत आलेल्या आहेत.

| अ.नं. | उमेदवारांचे नाव | तात्पुरत्या स्वरूपात | दरमहा मानधन | आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक जा.क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | नागापुरे संजय हिरामण | पंपचालक | ६०००/- | ३४/ दि.०४/०४/२०१२ |
| २ | साळवे शरद मल्हारी | पंपचालक | ६०००/- | ३४/ दि.०४/०४/२०१२ |
| ३ | गोरे कवि दशरथ | पंपचालक | ६०००/- | ३४/ दि.०४/०४/२०१२ |
| ४ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | ६०००/- | ३४/ दि.०४/०४/२०१२ |
| ५ | तांबे गौतम भास्कर | पंपचालक | ६०००/- | ३४/ दि.०४/०४/२०१२ |
| ६ | पालवे संदिप गोरक्षनाथ | विज तंत्री | ६०००/- | ३४/ दि.०४/०४/२०१२ |

तरी वरील प्रमाणे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरूपात पदांवर कंत्राटी करारानुसार सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योतर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब : पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पदांवर अटी व शर्ती नुसार केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- पाणीपुरवठा विभागासाठी कंत्राटी करारानुसार घेण्यांत आलेले कर्मचारी कोण-कोण आहेत त्या कर्मचा-यांची माहिती द्यावी. जुन्या गावठाण हद्दीत असलेल्या पाईप लाईन ह्या जुन्या असल्याने त्यांची दुरुस्ती वेळोवेळी करावी लागते. त्याकरीता आवश्यक असणारा फिटर कर्मचारी वर्ग कमी आहे. यापुर्वी महानगरपालिकेचे कर्मचारी असलेले श्री.भाउ जाधव हे चांगले काम करीता होते. त्यांच्या सेवानिवृत्ती नंतर त्यांचेजागी कोणाची नेमणुक केलेली नाही. श्री.भाउ जाधव यांना मानधनावर घेण्यांत यावे.

मा.उपायुक्त(सा)डॉ.डोईफोडे :-मनपा सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना मानधनावर घेता येत नाही.

आस्थापना प्रमुख श्री.अंबादास सोनवणे :- जा.क्र.१५८ दिनांक १३/०३/२०१२ अन्वये दिनांक १०/१०/२०११ पासुन सहा महिने इतक्या कालावधीकरीता पंपचालक म्हणुन ५ लोकांची व विजतंत्री म्हणुन एकाची तात्पुरत्या स्वरुपात मानधन रक्कम रु.६०००/- नेमणुक करण्यांत आलेली होती. त्यांची मुदत दिनांक ०८/०४/२०१२ रोजी संपुष्टात येत आहे.कामाच्या आवश्यकते नुसार त्यांना पुन:नेमणुक देणे आवश्यक आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- सध्या उन्हाळयाचे दिवस असल्याने नागरीकांची पाण्या बाबतची मागणी वाढलेली आहे. सध्या घाण पाणी व लिकेज लाईन बाबत समस्या वाढलेल्या आहेत. फिटरची संख्या कमी आहे. महानगरपालिकेकडे सध्या किती फिटर कार्यरत आहेत.

मॅके. इंजि.श्री.निकम पी.जे.:- सध्या दोन फिटर व २३ बिगारी कर्मचारी आहेत. वेळोवेळी कर्मचारी मिळणे बाबत प्रस्ताव सादर करण्यांत आलेले आहेत.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- पाणी पुरवठा विभागाच्या प्रस्तावानुसार कर्मचारी देणेबाबतचा विचार करणे आवश्यक आहे. यापुर्वी कर्मचारी मिळणे बाबतच्या दिलेल्या प्रस्तावाचे पुढे काय केले.

मा.उपायुक्त (सा) डॉ. डोईफोडे :- कनिष्ठ अभियंता व जोडारी या पदाकरीता जाहीरात देवुन कार्यवाही अंती तीन लोक मिळालेले आहेत. बाकी उर्वरीत रिक्त राहिलेल्या पदांकरीता जाहीरात दिलेली आहे. फिटर, विजतंत्री, जोडारी भरती बाबत जाहीरात देवुन चार उमेदवार मिळालेले आहेत. मानधन अपुरे असल्याने महानगरपालिकेत कर्मचारी येण्यास तयार होत नाहीत. मानधन वाढीचा प्रस्ताव ठेवलेला आहे.

मॅके.इंजि.श्री.निकम पी.जे.:-शहरातील पाईप लाईन लिकेज काढणे, घाण पाणी किरकोळ दुरुस्ती करीता महानगरपालिकेच्या पॅनलवर चार युनिट तयार करावयाचे आहेत. सदरचे काम चार एजन्सींना विभागुन द्यावयाचे आहे. पॅनल तयार करुन ते संपुर्ण शहर भर फिरते ठेवावयाचे आहे. ज्या प्रभाग अधिका-यांची पाण्या बाबत तक्रार येईल त्यानुसार त्यांना पाठवुन काम करुन घेण्यांत येईल.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता पंपचालक , विजतंत्री पदी कंत्राटी करारानुसार दिनांक १२/४/२०१२ पासुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योतर सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे.

| अ.नं. | उमेदवारांचे नाव | तात्पुरत्या स्वरूपात | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| १ | नागापुरे संजय हिरामण | पंपचालक | ६०००/- |
| २ | साळवे शरद मल्हारी | पंपचालक | ६०००/- |
| ३ | गोरे कवि दशरथ | पंपचालक | ६०००/- |
| ४ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | ६०००/- |
| ५ | तांबे गौतम भास्कर | पंपचालक | ६०००/- |
| ६ | पालवे संदिप गोरक्षनाथ | विज तंत्री | ६०००/- |

ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

अनुमोदक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-३**

विषय क्रमांक-१४ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

ठराव क्रमांक-१४ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये विविध ठिकाणी टँन्कर्सद्वारे पाणी पुरवठा करणेकामी सन २०१२-२०१३या आर्थिक वर्षासाठी (जिपीएस सिस्टिमसह) मागविण्यांत आलेल्या निविदा व याकामी येणारे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा शहर पाणी पुरवठा विभाग जा.क्र.५० दि.१३/४/२०१२

प्रस्तावना-विषय- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये टँन्कर्सद्वारे पाणी पुरवठा करणेकामी (जिपीएस सिस्टीमसह) मागविण्यांत आलेल्या निविदेतील दराबाबत.

संदर्भ :- १] मे. दिपाली ट्रान्सपोर्ट, अ.नगर यांचा दि. २६/११/२०११ चे पत्र
२] मे. दिपाली ट्रान्सपोर्ट, अ.नगर यांचा दि. १५/३/२०१२ चे पत्र

अ.नगर महानगरपालिका हद्दीतील सारसनगर, इंदिरानगर, नगर कल्याणरोड वरील वसाहती व शहर- सावेडी भागामध्ये निविदा मागवून भाडेतत्वाने टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करणेकामी जाहीर निविदा मागविण्यांत आली होती, त्यामध्ये आलेल्या मोहोरबंद निविदा उघडण्यात आल्या, त्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.

**१] जाहिर निविदा प्रसिध्द दि.२९/३/२०११(निविदा विक्री संख्या:५,प्राप्त मोहोरबंद निविदा: निरंक)**
**२] फेर जाहिर निविदा क्र.१ प्रसिध्द दि.३०/४/२०११(निविदा विक्री संख्या:४,प्राप्त मोहोरबंद निविदा: निरंक)**
**३] फेर जाहिर निविदा क्र.२ प्रसिध्द दि.९/६/२०११**
**४] कोरी निविदा विक्री दिनांक :९/६/२०११ ते १६/६/२०११(निविदा विक्री संख्या:२,प्राप्त मोहोरबंद निविदा:२)**
**५] मोहोरबंद निविदा स्विकृती दिनांक : १८/६/२०११ दुपारी १.०० वा. पर्यंत**
**६] प्राप्त मोहोरबंद निविदा संख्या : २ (दोन)**
**७] मोहोरबंद निविदा उघडल्याची दिनांक : १८/१०/२०११ आलेले दर खालीलप्रमाणे :-**
**८] कमी दराच्या निविदा धारकाचे दर खालीलप्रमाणे आहेत.-**

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव | निविदाधारकाने नमूद केलेले दर (जीपीएस सिस्टिमसह) | | | शासकीय दर शासन निर्णय क्र. टंचाई-१००८/ प्र.क्र. ४८/ पा.पु.१४ दि.११ नोव्हें.२००९ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १२ तासाचे भाडे | २४ तासाचे भाडे | प्रति कि..मी. डिझेल दर | प्रति दिन कमाल भाडे | कमाल प्रति कि.मी. भाडे |
| १ | मे.दिपाली ट्रान्सपोर्ट | | | | १ मे. टनासाठी | प्रतिकि.मी. साठी |
| | १० मे. टन | १७००.०० | ३०००.०० | १५.०० | रू.११८.२७/- | रू. १.३६/- |
| | ७.५ मे. टन | १४००.०० | २८००.०० | १५.०० | | |
| | ४ मे.टन | १४००.०० | २८००.०० | १५.०० | | |
| | ३ मे.टन | १४००.०० | २८००.०० | १५.०० | | |

मे.दिपाली ट्रान्सपोर्ट ,अ.नगर यांना निविदा दराच्या वाटाघाटीसाठी इकडील जा.क्र. पा.पु.१०५२ दि.३/११/२०११ अन्वये पत्र देवून दि.४/११/२०११ रोजी दु. ४.०० वा.छाननी समितीमध्ये उपस्थित रहाणेबाबत कळविणेत आले.सदर छाननी समितीमध्ये निविदा दराच्या वाटाघाटीबाबत निर्णय झाल नाही, संबंधीत निविदाधारकास निविदेच्या सुधारित दराबाबत मनपास पत्र देवून कळविणेचे सुचित करण्यात आले. त्यानुसार संबंधीत संस्थेने दि.२६/११/११ रोजी इकडेस पत्र देवून जी.पी.एस. यंत्रणेसाठी रू.२.१० लाख प्रति टॅकर वार्षिक थर्ड पार्टी विमा रू.११,७००/- , टॅकरचे सुटे भाग, टयुब, टायरचे किंमतीमध्ये झालेली ४०% टक्के वाढ, वाहन चालकांचे पगार व भत्ते याचा तसेच सन २००९ चे प्रति लिटर डिझेल दर व सध्याचे डिझेल दर यातील तफावत यांचा विचार करून खाली नमूद केलेल्या दराने १ वर्षासाठी ठेका मंजुर करणार असेल तर काम करणेस तयार असल्याचे कळविले आहे.

| . नं. | निविदाधारकाचे नांव | निविदाधारकाने नमूद केलेले दर (जीपीएस सिस्टिमसह) | | |
|---|---|---|---|---|
| | मे.दिपाली ट्रान्सपोर्ट | १२ तासाचे भाडे | २४ तासाचे भाडे | प्रति कि..मी. डिझेल दर |
| १ | १० मे. टन | १४००.०० | २८००.०० | १५.०० |
| २ | ७.५ मे. टन | -- | -- | १५.०० |
| ३ | ४ मे.टन | १०००.०० | २०००.०० | १५.०० |
| ४ | ३ मे.टन | -- | -- | १५.०० |

निविदाधारकाने वर नमूद केलेले सुधारित दर अवाजवी असून सन २००९-१० च्या शासन निर्णयानुसार १० मे. टनासाठी कमाल भाडे रू.११८२.७०/- व कमाल प्रति लिटर भाडे रू.१३.६०/- चे दर लक्षात घेता महानगरपालिकेला जी.पी.एस. यंत्रणेसह टॅकर भाडे तत्वावर लावावयाचा असल्याने १० मे. टनासाठी रू.१३००/- व ४ मे.टनासाठी रू.९००/- तसेच सध्याचा डिझेल दर लक्षात घेता प्रति लिटर डिझेल रू.१३.६०/- या दराने देणे योग्य वाटते. असा अहवाल दिला यावर मे. दिपाली ट्रान्सपोर्ट ,अ.नगर यांना मनपाने प्रस्तावीत केलेल्या टॅकरच्या प्रति दिन भाडे व प्रति कि.मी. डिझेल दराबाबत आज दि.१४/३/२०१२ रोजी समक्ष विचारणा केली असता त्यांनी **दि.१५/३/२०१२ रोजी इकडेस पत्र देवून मनपाने प्रसतावीत केलेल्या टॅकर्सच्या प्रति दिन भाडयाचे दराने (प्रति दिन भाडे १० मे. टनासाठी रू.१३००/- व ४ मे. टनासाठी रू.९००/- ) काम करणेस संमती दिलेली आहे. परंतु टॅकरचे भाडयाव्यतिरिक्त प्रति कि.मी. १३.६०/- ऐवजी प्रती कि.मी. १४/- हे दर मान्य करीत असल्यास काम करणेचे नमूद केले आहे.** मा. शासनाचे मंजुर डिझेलचे प्रति कि.मी. रू.१३.६०/- चे दर जून २००९ मधील मंजुर दर आहेत. सदरवेळी बाजारातील डिझेलचा दर प्रती लिटरसाठी रू.३५.९०/-असा होता. सद्यस्थितीतील बाजारातील प्रति लिटर डिझेलचा दर लक्षात घेता ( सध्याचा डिझेल दर रू.४४.७१/- प्रति लिटर) मे. दिपाली ट्रान्सपोर्ट ,अ.नगर यांनी दिलेला सुधारित दर रू.१४/- प्रति कि.मी. दर मान्य करणेस हरकत नाही.

मा.शासनाकडील चालू वर्षीच्या दराबाबत मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडील टंचाई शाखे कडेस समक्ष चौकशी केली असता चालू वर्षाचे दराचा शासन निर्णय अद्याप आला नसल्याचे सांगितले आहे.

टॅंकर्सद्वारे पाणी पुरवठा करणे या लेखाशिर्षाअंतर्गत सन १२-१३या आर्थिक वर्षासाठी रक्कम रू.४०.००लाख इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत १० मे. टनाचे ५ व ४ मे. टनाचा १असे ५टॅंकर्स कार्यरत आहेत. प्रस्तावीत दरानुसार प्रति महिना अंदाजे रू.४.००लाख खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरच्या कामास व खर्चास तसेच प्रस्तावीत दराबाबतचा रिपोर्ट प्रशासकीय मान्यतेसाठी मा.स्थायी समिती कडेस पाठविणेस आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब : विविध ठिकाणी टॅन्कर्सद्वारे पाणी पुरवठा करणेकामी आर्थिक वर्षासाठी (जिपीएस सिस्टिमसह) मागविण्यांत आलेल्या निविदा व याकामी येणारे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- मनपा हद्दीत वेळोवेळी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याऐवजी त्या भागात कायम स्वरूपी पाईपलाईन टाकण्यात याव्यात टँकर पाणीपुरवठयावर खुप खर्च होत आहे असे किती दिवस पाण्यासाठी टँकर चालु ठेवणार पुर्वीप्रमाणे टँकर संख्या वाढवली आहे काय?

मा.उपायुक्त (सा) :- टँकरची संख्या कमी केलेली आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- चालु वर्षी टँकर पाणी पुरवठयावर किती तरतुद दाखविली आहे.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- ४० लाख तरतुद दाखविली आहे.

मा.श्री. कावरे द.ह.:- सध्या उन्हाळयाचे दिवस असल्याने पाण्याची आवश्यकता असल्याने टँकरची संख्या वाढवावी व ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये विविध ठिकाणी भाडे तत्वावर टॅन्कर्सद्वारे पाणी पुरवठा करणेकामी सन२०१२-२०१३या आर्थिक वर्षासाठी (जिपीएस सिस्टिमसह) मागविण्यांत आलेल्या निविदेतील निविदाधारकाने वाटाघाटी अंती दिलेले दरानुसार प्रति दिन१०मे. टनासाठी रक्कम रूपये १३००/-(रूपये तेराशे फक्त)व ४ मे.टनासाठी रक्कम रूपये९००/- (रूपये नउशे फक्त)तसेच भाडया व्यतिरिक्त प्रति कि.मी. रक्कम रूपये १४/-(रूपये चौदा फक्त) याप्रमाणे प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कावरे दत्तात्रय हरिभाउ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती ,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-३**

विषय क्रमांक-१५ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

ठराव क्रमांक-१५ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत कामांसाठी पी.एम.सी. नेमणूकीची करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. जा.क्र.२३ सार्व.बां. विभाग दिनांक १२/०४/२०१२

प्रस्तावना-विषय- फेर टेंडर नोटीस क्र.४ ई- निविदा क्र.१९२/२०११-१२ च्या मंजुरी बाबत.

कामाचे नांव- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत कामांसाठी PMC नेमणुकी बाबत.

उपरोक्त विषयाबाबत खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१]प्रशासकीय मान्यता : महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत कामांसाठी मा.शासन निर्णय क्र.नगरो-२०१०/ प्र.क्र.२४२/ नवि-३३ मंत्रालय मुंबई-३२ यांचे दि.३१/३/२०११ अन्वये मंजुरी.

२] निविदा (परिशिष्ट "ब") रक्कम रू.:- ५८,६१,७४,०००/-

३] निविदा प्रसिध्दी तारीख :- दि.३१/०१/२०१२ दै. लोकमत (ई- निविदेबाबतची सुचना)

४] निविदा विक्री कालावधी :- दि.३१/०१/२०१२ ते दि.०६/०२/२०१२

५] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.०९/०२/२०१२ ते दि.१३/०२/२०१२अखेर

६] निविदा उघडण्याची तारीख :- दि.०७/०३/२०१२

७] कामाची मुदत :- सदरहू योजनेतील कामे पुर्ण होईपर्यंत

८] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदा दरापेक्षा देकार |
|---|---|---|
| १ | जगप्रयाग इन्फ्रा. प्रा.लि. नवी मुंबई | निविदा अपात्र |
| २ | मे. यश इंजि. कंन्सलटंट, पुणे | २.१० % जादा दराने |

उपरोक्त कामासांठी एकुण ५ वेळा निविदा मागविण्यांत आल्या होत्या पाचव्या वेळेस २ निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यांची नावे पुढील प्रमाणे. १] मे. यश इंजि. कन्सलटंट, पुणे व २] जगप्रयाग इन्फ्रा. प्रा.लि. नवी मुंबई सदरच्या निविदांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला असता कागदपत्रांच्या त्रुटीबाबत संबंधीताना दि.१८/०२/२०१२ रोजी पत्रे देउन पुर्तता करणे विषयी कळविले असता मे. यश इंजि. कन्सलटंट , पुणे यांनी निविदा अटी शर्ती प्रमाणे पुर्तता केलेली आहे.

तथापि जगप्रयाग इन्फ्रा,प्रा.लि.नवीमुंबई यांनी निविदा अटी शर्ती प्रमाणे पुर्तता केली नसल्यामुळे प्राप्त दोन निविदा पैकी मे.यश इंजि.कन्सलटंट, पुणे यांचा दराचा व्यापारी लिफाफा उघडणे तसेच इव्हॉल्युशन शिटवर संबंधीत ठेकेदारांनी जोडलेल्या कागदपत्रांनुसार गुण देणे बाबत मा.छाननी समितीने शिफारस केल्यानुसार मे.यश इंजि.कन्सलटंट, पुणे यांचा दराचा व्यापारी लिफाफा उघडणे तसेच इव्हॉल्युशन शिटवर संबंधीत ठेकेदार मे.यश इंजि.कन्सलटंट,पुणे यांनी जोडलेल्या कागदपत्रां नुसार गुण देणे बाबत मान्यतेस्तव तथा आदेशास्तव अहवाल मा.आयुक्त यांचेकडेस सादर केला

असता मा.आयुक्त यांच्या दि.७/०३/२०१२ च्या मान्यतेने ठेकेदार मे. यश इंजि. कन्सलटंट , पुणे यांचा दराचा व्यापारी लिफाफा दि.०७/०३/२०१२ रोजी उघडण्यात आला.

तरी वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने **मे. यश इंजि. कन्सलटंट,** पुणे यांचा देकार सर्वात कमी म्हणजे २.१० % आहे. तो अवाजवी असुन कमी दराचे निविदा धारकास दराचे वाटाघाटीसाठी मा.छाननी समिती समोर मा.उपायुक्त (सा.) यांचे दालनात दि.१९/०३/२०१२ रोजी दु.४.०० वाजता समक्ष उपस्थित राहणे अथवा अंतिम दराबाबत लेखी पत्र सादर करणे बाबत जा.क्र. सा.बां.वि. १६४३/६ दि.०९/०३/२०१२ अन्वये पत्र दिले होते. त्यानुसार **मे.यश इंजि. कन्सलटंट** यांनी दि.१९/०३/२०११ रोजी समक्ष दिलेल्या पत्रानुसार निविदेमध्ये भरलेले दर कमी करून सदरचे काम **२.०८%** दराने करणेस तयार असलेबाबत कळविले आहे.

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता मा.छाननी समिती समोर दि.१९/०३/२०१२ रोजी ठेवला असता मा.छाननी समितीने **मे.यश इंजि. कन्सलटंट** यांना सदरचे काम निविदेप्रमाणे होणा-या मुळ देयकाच्या रकमेच्या **२.०८%** दराने देणेची शिफारस करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे .

| | | |
|---|---|---|
| १२ | एकुण ९ ररत्यांच्या कामांची निविदा रक्कम | रू.५८,६१,७४,०००/- |
| १३ | मा.छाननी समितीने निविदेप्रमाणे होणा-या मुळ देयकाच्या रकमेनुसार केलेली शिफारस | २.०८% |
| १४ | मा.छाननी समितीने निविदेप्रमाणे होणा-या मुळ देयकाच्या रकमेनुसार केलेल्या शिफारशीनुसार होणारी रक्कम | रू.१,२१,९२,४१९/- |

तरी मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार **मे. यश इंजि. कन्सलटंट** यांना सदरचे काम निविदेप्रमाणे होणा-या मुळ देयकाच्या रकमेच्या **२.०८%** दराने देणेस सदरची निविदा मंजुरीस्तव तथा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव पाठविणेस मा.आयुक्त यांनी दि.११/०४/२०१२ रोजी मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब : महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत कामांसाठी PMC नेमणुकी बाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. कावरे द.ह. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.लोंढे सु.सो.:-महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत करावयाच्या कामाकरीता पी.एम.सी.नेमणूकीची आवश्यकता काय आहे व त्यांचे काम कशा स्वरुपाचे असेल.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- सदर कामाकरीता पी.एम.सी. म्हणुन किती एजन्सीने टेंडर भरले होते.

प्र.शहर अभियंता श्री.सातपुते :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महायोजने अंतर्गत करावयाच्या कामाकरीता पी.एम.सी. नेमणूकीकरीता चार वेळा टेंडर प्रसिध्द करण्यांत आले होते. कुठल्याही एजन्सीने सदर टेंडरला प्रतिसाद दिलेला नाही. पाचव्या वेळी टेंडर फॉर्म प्रसिध्द केल्यानंतर दोन एजन्सीनी टेंडर भरलेले आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- ज्या एजन्सींनी सदर कामाचे टेंडर भरलेले आहेत. त्यांचे प्रतिनिधी माहिती देणे करीता आजच्या सभेत उपस्थित आहेत काय ? उपस्थित राहणे बाबत त्यांचेशी पत्रव्यवहार केला आहे काय?

प्र.शहर अभियंता श्री.सातपुते :- संबंधीत एजन्सीला वर्कऑर्डर दिल्याशिवाय सभेमध्ये उपस्थित रहाणेकरीता बोलविता येत नाही.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- महानगरपालिकेचे काम करतांना पी.एम.सी. म्हणुन नेमणूक झाल्यानंतर त्यांचेकडे किती लोकांची टीम असेल

प्र.शहर अभियंता श्री.सातपुते. :- प्रत्यक्ष कामाच्या साईट नुसार लोकांची टीम ठेवावी लागेल. संपुर्ण कामाची जबाबदारी पी.एम.सी. म्हणुन त्यांची असेल. त्यांचे लेखी रिपोर्ट घेणार.

मा.श्री. जगताप नि.वि.:- महानगरपालिकेच्या प्रत्येक कामासाठी पी.एम.सी. म्हणुन एखाद्या खाजगी एजन्सीची नेमणुक करावयाची त्याकरीता महानगरपालिकेस खुप मोठया प्रमाणावर खर्च येत आहे. महानगरपालिकेचे इंजिनियर त्या कामावर देखरेख ठेवू शकत नाहीत काय ?

प्र. शहर अभियंता श्री.सातपुतेः- महानगरपालिकेकडे इंजिनियर यांची संख्या अत्यल्प असल्याने प्रत्येक कामावर लक्ष देणे शक्य होत नसल्याने पी.एम.सी. नेमणुक करणे आवश्यक आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- महानगरपालिकेने यापुर्वी केलेल्या मोठमोठया कामांकरीता पी.एम.सी.म्हणुन खाजगी एजन्सीची नेमणुक केलेली होती सदर एजन्सीचा पुर्वीचा अनुभव पहाता कुठल्याही एजन्सीचे कामकाज समाधानकारक झालेले नाही.

मा.श्री.भोसले ग.पुं. व मा.श्री. डागवाले कि.आ.:- पुर्वीच्या एजन्सीच्या कामकाजांचा अनुभव पहाता नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गत करावयाच्या कामाकरीता एजन्सी नेमणूक न करता महानगरपालिके मध्ये तात्पुरते इंजिनियर नेमुन त्यांचेकडुन काम करुन घेण्यांत यावे. पी.एम.सी नेमणुकी अभावी सदर योजनेतील कामांच्या वर्क ऑर्डर थांबवू नका त्या देण्यांत याव्यात.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- पी.एम.सी.म्हणुन नेमणूक केलेल्या एजन्सीने सदर कामांबाबतची पुर्ण माहिती दिल्याशिवाय त्यांना काम देवू नका.

मा.उपायुक्त (कर) मा.सौ. झगडे मॅडम :- महानगरपालिके मार्फत पी.एम.सी. नेमणुक केल्यानंतर महानगरपालिका ठरवेल त्या अटी शर्तीनुसार त्यांना काम करावे लागेल.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- कागदपत्री छान छान वाटते प्रत्यक्षात काम होत नाही. एजन्सीची नेमणुक केल्यानंतर त्यांना अदा करावयाचे बील काम झाल्याशिवाय देवू नये.

मा.उपायुक्त(सा)डॉ.डोईफोडे साहेब :- कामाच्या प्रगतीनुसार त्यांना टक्केवारी प्रमाणे बील द्यावे लागेल.

मा.श्री.भोसले ग.पुं. व मा.श्री. डागवाले कि.आ.:- सदर योजने अंतर्गत करावयाच्या कामाच्या पीएमसी नेमणूकीच्या वर्क ऑर्डर देणेपुर्वी एजन्सींना बोलाविण्यांत यावे.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- नगरोत्थान योजने अंतर्गत करावयाच्या कामाबाबत पी.एम.सी.म्हणुन नेमणूक केल्यानंतर त्यांनी काम योग्य प्रकारे केले नाही तर त्याची जबाबदारी कोण घेणार ?

मा.उपायुक्त (सा) डॉ. डोईफोडे साहेब :- आपण सदर नेमणुक केलेल्या पी.एम.सी.कडुन काम करुन घेणार आहोत. टेंडर मधील अटी शर्ती नुसार त्यांना काम करावे लागेल.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- नगरोत्थान मधील कामाच्या वर्क ऑर्डर करणे बाबत आजचा ठराव करण्यांत यावा.

मा.उपायुक्त (सा) डॉ. डोईफोडे साहेब :- नगरोत्थान योजने अंतर्गत सुचविण्यांत आलेल्या कामांकरीता पी.एम.सी.म्हणुन एखाद्या एजन्सीची नेमणुक झाल्याशिवाय सदरच्या कामाच्या वर्क ऑर्डर देता येणार नाहीत. कामाच्या पहिल्या टप्प्यापासुन त्यांचे काम सुरु होते. पी.एम.सी.म्हणुन नेमणुक झाल्याशिवाय त्यांना सभेपुढे माहिती देणेकरीता बोलाविणे योग्य नाही.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महायोजने अंतर्गत पी.एम.सी. म्हणुन नेमणूकीची दुसरी निविदा कोणी भरलेली आहे.

प्र.शहर अभियंता श्री.सातपुते:- जगप्रयाग इन्फ्रा.प्रा.लि. नवि मुंबई यांनी भरलेली आहे. यांनी निविदा भरतांना त्यांचेकडे असणा-या कर्मचा-यांबाबत माहिती दिलेली नाही. दिनांक १८/०२/२०१२ रोजी पत्र देवुन माहिती मागविली असता माहिती अद्याप अप्राप्त आहे. यापुर्वी सदर एजन्सीने आपल्याकडे काम केलेले आहे. त्यांनी पी.एम.सी.म्हणुन टेंडर भरतांना तांत्रिक लिफाफा अपुर्ण भरलेला आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- महानगरपालिके मार्फत करण्यांत येणा-या प्रत्येक विकास कामाकरीता अशाच पध्दतीने खाजगी एजन्सीची नेमणुक करणार आहात काय ?

प्र.शहर अभियंता श्री.सातपुते:- इतर महानगरपालिकेत सुध्दा मोठमोठे प्रकल्प राबवितांना खाजगी एजन्सीची नेमणुक करुन काम केले जाते. आपल्या महानगरपालिके मध्ये इंजिनियर यांची संख्या कमी आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- पी.एम.सी.म्हणुन नेमणुक केल्यानंतर त्यांना रक्कम रु १.५० कोटी द्यावे लागणार आहेत.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- नगरोत्थान योजने अंतर्गत करावयाच्या कामाकरीता पी.एम.सी.म्हणुन नेमणुक केल्यानंतर त्यांनी सर्व समिती सदस्यांना डेमो दाखवावा. सदरचा डेमो दाखवते वेळी पत्रकारांना उपस्थित राहणे बाबत कळविण्यांत यावे.

मा.श्री.भोसले ग.पुं.:-सदर एजन्सीची पी.एम.सी.म्हणुन नेमणुक केल्यानंतर त्यांचे काम असमाधानकारक आढळुन आल्यास त्यांना देण्यांत आलेली वर्क ऑर्डर रद्द करण्यांत यावी.

मा.श्री.जगताप नि.वि.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.कावरे द.ह. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत कामांसाठी पी.एम.सी.(PMC)नेमणूक करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा ऑफिस रिपोर्ट पहाता मा.छाननी समितीने शिफारस केल्यानुसार कमी दराचे निविदा धारक मे.यश इंजि.कन्सलटंट,पुणे यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या दराप्रमाणे सदरचे काम निविदेप्रमाणे होणा-या मुळ देयकाच्या रकमेच्या २.०८% दराने देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.जगताप नितीन विलास सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कावरे दत्तात्रय हरिभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती ,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-३**

विषय क्रमांक-१६ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

ठराव क्रमांक-१६ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गोविंदपुरा ते कॅन्टोनमेंट नाल्यापर्यंतच्या रस्त्याच्या बाजुने पावसाचे पाणी जाण्यासाठी आर.सी.सी. पाईप गटर करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. जा.क्र.७४ सार्व.बां. विभाग दिनांक २३/०४/२०१२
प्रस्तावना-विषय- फेर टेंडर नोटीस क्र.४ ई- निविदा क्र.१९६/२०११-१२ च्या मंजुरी बाबत.
कामाचे नांव-महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गोविंदपुरा ते कॅन्टोनमेंट नाल्यापर्यंतच्या रस्त्याच्या बाजुने पावसाचे पाणी जाण्यासाठी आर.सी.सी. पाईप गटर करणे.

उपरोक्त विषयाबाबत खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :मा. शासन निर्णय क्र. नगरो-२०१०/प्र.क्र. २४२/नवि-३३ मंत्रालय मुंबई -३२ यांचे दिनांक ३१/३/२०११ अन्वये मंजुरी
२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- २,०४,६४,५६७/-
३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- २,०४,६४,५६७/-
४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सा.बां. वि. म.जि. प्रा. २०१०-११
५] निविदा (परिशिष्ट "ब") रक्कम रू. :- २,०४,६४,५६७/-
६] निविदा प्रसिध्दी तारीख :- ई- निविदा क्र. १९४ ते १९९ दि.०१/०२/२०१२ दै. पुढारी (ई- निविदेबाबतची सुचना )
७] निविदा विक्री कालावधी :- दि.०१/०२/२०१२ ते दि.०९/०२/२०१२
८] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.१३/०२/२०१२ ते १६/०२/२०१२ अखेर
९] निविदा उघडण्याची तारीख :- दि.०७/०३/२०१२,
१०] कामाची मुदत :- ६ महिने
११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदा दरापेक्षा देकार |
|---|---|---|
| १ | मे. मनिषा कंन्स्ट्र. | निविदा अपात्र |
| २ | मे.आर.आर. कपुर | निविदा अपात्र |
| ३ | मे.बेस्ट कंन्स्ट्र.,कंपनी | १७.९९% जादा दराने |

उपरोक्त निविदांच्या तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्राबाबत आयोजित बैठकीत निविदा क्र.१९६ साठी प्राप्त तीन निविदा धारकांपैकी मे.मनिषा कंन्स्ट्र., व मे.आर.आर.कपूर या दोघांची निविदा अटी शर्तीनुसार पुर्तता होत नसल्याने त्यांचा दराचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येउ नये तसेच उर्वरित ठेकेदार मे.बेस्ट कंन्स्ट्र, यांनी तांत्रिक लिफाफ्या मधील कागदपत्रांची निविदा अटी शर्ती नुसार पुर्तता

केली असल्याने मा.महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.१०९४/(२६७९) / उदयोग-६ दि.३० मार्च १९९४ व मा. महाराष्ट्र शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. झेडपीए२००८/ प्र.क्र. ३५८ / वित्त- ९ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक २४ जून २००८ अनुसार "एखाद्या निविदेला दोन वेळा मुदतवाढ आणि पुरेशी प्रसिध्दी देउनही एकच निविदा प्राप्त झाल्यास सदरची निविदा शासनाचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होणार नाही याची पुरेशी खात्री करून उघडण्यास अनुमती दिलेली आहे" त्यानुसार निविदा क्र.१९६ च्या कामांसाठी उर्वरित एकच व निविदा क्र. १९७ च्या कामांसाठी प्राप्त मे.बेस्ट कंन्स्ट्र., यांची एकमात्र निविदा असल्याने वरील नमुद शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने उपरोक्त निविदा क्र.१९६ चा **बेस्ट कंन्स्ट्र.** यांचा व्यापारी लिफाफा उघडणे बाबत मा.छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार दि.०५/०३/२०१२चा इतिवृत्तानुसार मा.आयुक्त याच्या दि.०६/०३/२०१२ रोजीच्या मान्यतेने **मे.बेस्ट कंन्स्ट्र.** यांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला.

त्यानुसार वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने **मे.बेस्ट कंन्स्ट्र., कंपनी, अहमदनगर** यांचा देकार सर्वात कमी म्हणजे **१७.९९%** जादा आहे. निविदा धारकाने भरलेल्या दराची सन २०११-२०१२ सा.बां.वि. च्या सुधारित चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **८.८५%** जादा येत असुन तो अवाजवी असल्यामुळे दराचे वाटाघाटीसाठी मा.उपायुक्त (सा.) यांचे दालनात दि.१२/०३/२०१२ रोजी स. ११.०० वाजता समक्ष उपस्थित राहणे अथवा अंतिम दराबाबत लेखी पत्र सादर करणे बाबत जा.क्र. सा.बां. वि. १६४३/६ दि.०९/०३/२०१२ अन्वये पत्र दिले होते. त्यानुसार दि.१२/०३/२०११ रोजी समक्ष दिलेल्या पत्रानुसार त्यांनी निविदेमध्ये भरलेले दर योग्य आहेत. परंतु सद्यस्थिती पाहता हे काम १] खोदाई काळया मातीमध्ये आहे (B.C.Soil) तसेच २] हे काम अत्यंत अडचणीच्या जागेतुन करावयाचे आहे. ३] सिमेंटचे दर हे वारंवार साधारण वर्षभरात २५% पर्यत वाढ आहे. कामाची मुदत १२ महिनेच आहे. परंतु पावसाळा- कालावधी धरून मुदत आहे. पावसाळयात या ठिकाणी काम करणे शक्य होणार नाही. याकारणास्तव पाईपचे दर हे साधारण २० ते २५ % वाढ होईल.

तसेच आपल्याकडे भाववाढ क्लॉज गृहीत नसल्याने याकामासाठी आम्ही सादर केलेले निविदा दर योग्य आहेत. आपल्या विनंतीला मान देउन आम्ही हे काम **१४.९०% जादा** दराने करण्यास तयार आहे. तरी आमच्या अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार होउन निविदा मंजुर होणेस विनंती आहे. अशा आशयाचे पत्र सादर केले आहे.

संबंधीत ठेकेदारांनी दिलेल्या सुधारित दरानुसार तुलना करता मुळ निविदा सन २०१०-११ च्या दरसुचीनुसार असल्याने व मनपाकडे सा.बां. वि. कडील सन २०११-१२ ची सुधारित दरसुची प्राप्त झाल्याने सुधारित दराने पृथः करण केले असता सदरचा दर **६.०० % जादा** येत आहे. सदरचा तुलनात्मक तक्ता मा. छाननी समोर दि.१२/०३/२०१२ रोजी ठेवला असता मा.छाननी समितीने उपरोक्त निविदेबाबत निर्णय घेणेसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविणेबाबत शिफारस केलेली आहे.

**मे.बेस्ट कंन्स्ट्र, कंपनी** यांनी सदरचे काम निविदा दरापेक्षा **१४.९०% जादा** दराने करणेस दि.१२/०३/२०१२ रोजीच्या पत्रान्वये तयारी दर्शविली असुन सन २०११-२०१२ सा.बां.वि.च्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **६.००% जादा** येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू.२,३५,१३,७८७/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां.वि. २०११-१२अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू.२,२१,८१,९७५/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. १३,३१,८१२/- |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१४ x १००) / १२ | ६.००% जादा |

तरी मा.छाननी समितीने उपरोक्त निविदेबाबत निर्णय घेणेसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविणेस मा. आयुक्त यांनी दि.२४/०४/२०१२ रोजी मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेबः- नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत हद्दीतील गोविंदपुरा ते कॅन्टोनमेंट नाल्यापर्यंतच्या रस्त्याच्या बाजुने पावसाचे पाणी जाण्यासाठी आर.सी.सी. पाईप गटर करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. जगताप नि.वि. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कावरे द.ह. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठरावः-**अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गोविंदपुरा ते कॅन्टोनमेंट नाल्यापर्यंतच्या रस्त्याच्या बाजुने पावसाचे पाणी जाण्यासाठी आर.सी.सी.पाईप गटर करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा ऑफिस रिपोर्ट पहाता मा.छाननी समितीने शिफारस केल्यानुसार निविदा धारक मे.बेस्ट कंन्स्ट्र.,कंपनी,अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या निविदा दरापेक्षा १४.९०%जादा दराने सन २०११-२०१२सा.बां.वि.च्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर ६.००% जादा दराने देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. जगताप नितीन विलास सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कावरे दत्तात्रय हरिभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती ,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-३**

विषय क्रमांक-१७ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

ठराव क्रमांक-१७ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नगर-पुणे रस्त्यावरील केडगांव रेल्वे उड्डान पुल ते केडगांव रेणुका देवी मंदिरापर्यत रस्त्याचे पुलाच्या कामासह रूंदीकरण करून कॉक्रीटीकरणासह डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. जा.क्र.७५ सार्व.बांध. विभाग दिनांक २३/०४/२०१२

प्रस्तावना-विषय- फेर टेंडर नोटीस क्र.२ ई- निविदा क्र.१९४/२०११-१२ च्या मंजुरी बाबत.

कामाचे नांव-महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नगर-पुणे रस्त्यावरील केडगांव रेल्वे उड्डान पुल ते केडगांव रेणुका देवी मंदिरापर्यत रस्त्याचे पुलाच्या कामासह रूंदीकरण करून कॉक्रीटीकरणासह डांबरीकरण करणे

उपरोक्त विषयाबाबत खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :मा. शासन निर्णय क्र. नगरो-२०१०/प्र.क्र. २४२/नवि-३३ मंत्रालय मुंबई -३२ यांचे दिनांक ३१/३/२०११ अन्वये मंजुरी

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- १०,२५,१०,९१३/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- १०,२५,१०,९१३/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सा.बां. वि. म.जि. प्रा. २०१०-११

५] निविदा (परिशिष्ट "ब") रक्कम रू. :- १०,२५,१०,९१३/-

६] निविदा प्रसिध्दी तारीख :- ई- निविदा क्र. १९४ ते १९९ दि.०१/०२/२०१२ दै. पुढारी (ई- निविदेबाबतची सुचना )

७] निविदा विक्री कालावधी :- दि.०१/०२/२०१२ ते दि.०९/०२/२०१२

८] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.१३/०२/२०१२ ते १६/०२/२०१२ अखेर

९] निविदा उघडण्याची तारीख :- दि.०२/०३/२०१२

१०] कामाची मुदत :- १५ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदा दरापेक्षा देकार |
|---|---|---|
| १ | मे.ए.सी. कोठारी | २६.००% जादा दराने |
| २ | मे.आर.आर. कपुर | ३३.५५% जादा दराने |
| ३ | मे. ईगल कंन्स्ट्र., | ३५.००% जादा दराने |

त्यानुसार वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे **२६.००% जादा** आहे. निविदा धारकाने भरलेल्या दराची सन २०११-१२ सा.बां. वि. च्या सुधारित चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **९.३९%** जादा येत असुन तो अवाजवी आहे. तरी कमी दराचे निविदा धारकास दराचे वाटाघाटीसाठी मा. छाननी समिती समोर

मा.उपायुक्त(सा.)यांचे दालनात दि.१२/०३/२०१२ रोजी स.११.०० वाजता समक्ष उपस्थित राहणे अथवा अंतिम दराबाबत लेखी पत्र सादर करणे बाबत जा.क्र. सा.बां.वि. १६४३/५ दि.०९/०३/२०१२ अन्वये पत्र दिले होते. त्यानुसार दि.१२/०३/२०११ रोजी समक्ष दिलेल्या पत्रानुसार त्यांनी सदरचे काम **२२.००%जादा** दराने करण्यास तयार असल्याचे कळविले आहे.संबंधीत ठेकेदारांनी दिलेल्या सुधारित दरानुसार तुलना करता मुळ निविदा सन २०१०-११ च्या दरसुचीनुसार असल्याने व मनपाकडे सा.बां.वि. कडील सन २०११-१२ ची सुधारित दरसुची प्राप्त झाल्याने सुधारित दराने पृथ:करण केले असता सदरचा दर**५.९२%**जादा येत आहे. सदरचा तुलनात्मक तक्ता मा.छाननी समोर दि.१२/०३/२०१२ रोजी ठेवला असता मा.छाननी समितीने उपरोक्त निविदेबाबत निर्णय घेणेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेबाबत शिफारस केलेली आहे.

**मे.ए.सी.कोठारी** यांनी सदरचे काम निविदा दरापेक्ष **२२.००%जादा** दराने करणेस दि.१२/०३/२०१२ रोजीच्या पत्रान्वये तयारी दर्शविली असुन सन२०११-२०१२सा.बां.वि.च्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **५.९२ % जादा** येत आहे.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू.१२,५०,६३,३१४/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां.वि. २०११-१२अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू.११,८०,७२,८८३/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. ६९,९०,४३१/- |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१४ X १००) / १२ | ५.९२% जादा |

तरी मा.छाननी समितीने उपरोक्त निविदेबाबत निर्णय घेणेसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविणेबाबत शिफारस केल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव पाठविणेस मा.आयुक्त यांनी दि.२४/०४/२०१२ रोजी मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत नगर-पुणे रस्त्यावरील केडगांव रेल्वे उड्डान पुल ते केडगांव रेणुका देवी मंदिरापर्यत रस्त्याचे पुलाच्या कामासह रूंदीकरण करून कॉक्रीटीकरणासह डांबरीकरण करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. जगताप नि. वि. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कावरे द.ह. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नगर-पुणे रस्त्यावरील केडगांव रेल्वे उड्डान पुल ते केडगांव रेणुकादेवी मंदिरापर्यत रस्त्याचे पुलाच्या कामासह रूंदीकरण करून कॉक्रीटीकरणासह डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता मा.छाननी समितीने शिफारस केल्यानुसार स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा धारक मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या निविदा दरापेक्षा २२.००%जादा दराने सन२०११-२०१२सा.बां.वि.च्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर ५.९२%जादा दराने देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. जगताप नितीन विलास सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कावरे दत्तात्रय हरिभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती ,
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक-३

विषय क्रमांक-१८ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

ठराव क्रमांक-१८ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५ मधील स.नं. ६४ सावेडी येथील ओपन स्पेसमध्ये थिम पार्क (आरोग्य पार्क) निर्माण करणेकामी मा.जिल्हा नियोजन समिती ,अहमदनगर यांचेकडे नाविन्य पुर्ण योजने अंतर्गत प्रस्ताव पाठविणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा सार्व.बांधकाम विभगा दि.२८/०२/२०१२

प्रशासकीय मान्यतेसाठी

विषय- नाविन्य पुर्ण योजने अंतर्गत प्रभाग क्रमांक ५ मध्ये थिम पार्क (आरोग्य पार्क ) बाबत.

संदर्भ :-१] मा. विनीत नाथ पाउुलबुधे, विरोधी पक्ष नेता यांचे दि.५/१/२०१२ रोजीचे पत्र.

२] नगररचना विभाग जा.क्र. टी.पी.४०१५ दि.०४/०२/२०१२ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार रिपोर्ट करण्यात येतो की,अहमदनगर महानगरपालिका सावेडी स.नं. ६४या जमिनीचे रेखांकन मंजुर असुन रेखांकनामध्ये खुली जागा ९५०८.००चौ.मी. इतकी जागा आहे.

सदर जागेमध्ये मा. विनीत नाथ पाउुलबुधे , विरोधी पक्षनेता यांनी प्रभाग क्रमांक ५ मध्ये स.नं. ६४ मध्ये थिम पार्क तयार करणेबाबत मागणी केलेली आहे. सदर परिसर नव्याने हद्दवाढीमध्ये समावेश झालेला असुन या परिसरामध्ये नागरी वस्ती झपाटयाने वाढत आहे. विकसीत होत आहे.या परिसरातील नागरिकांसाठी सार्वजनिक उदयानाची सोय नाही परिसरातील जेष्ठ नागरिक, महिला युवक युवती लहान मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य पार्कची संकल्पना मांडली आहे. यामध्ये प्राणवायु निर्माण करणारे वक्षांची लागवड करणे, जॉगिंग पार्क, योग केंद्र अभ्यासिका , छोटे मोठे क्रीडा प्रकारचे प्रशिक्षण केंद्र, आयलॅड करणे व लहान मुलांसाठी खेळणी, आरोग्यवर्धक मोठी लॉन आशा प्रकारचे आरोग्यासाठी उपयुक्त असणारे "आरोग्य पार्क" (थिम पार्क) निर्माण करणे योग्य वाटते. स.नं.६४ ओपन स्पेस हा त्या भागातील मोठा ओपन स्पेस असुन त्यामध्ये आशा प्रकारे आरोग्य पार्क विकसीत होउ शकते व हद्दवाढ परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त होउ शकते. या कामासाठी अंदाजे ३५ लाख इतका खर्च अपेक्षीत असून सदर कामी येणारा खर्च जिल्हा नियोजन समिती यांचेकडील **"नाविन्य पुर्ण योजना"** मधून खर्च करता येणे शक्य आहे.

त्यानुसार जिल्हा नियोजन समितीला सदर बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेसह सादर करावा लागणार असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेसाठी सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

मा. इनचार्ज अभियंता :- अहवालानुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस मंजुरीस सादर.

मा. शहर अभियंता :- अहवालाप्रमाणे प्रस्ताव पुढील निर्णयास्तव तथा आदेशार्थ मा.स्थायी समिती कडे सादर करणे योग्य. तथापी आदेशार्थ सादर.

अं.ले.प.:- प्रस्तावाप्रमाणे प्र.क्र.५ मध्ये नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत थिम पार्क (आरोग्य पार्क) विकसित करणेकामी प्रस्ताव मान्यतेकरिता जिल्हा नियोजन समितीकडे सादर करणे पुर्वी मा.स्थायी समितीचे मान्यतेकरीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणेस निर्णयास्तव सादर. /**अ**

मा.उपायुक्त (सा.) :- नगररचनाकार यांच्या अभिप्रायासह सादर करा.

नगररचनाकार :- सादर, इकडील जा.क्र.टी.पी. ४०१५ दि.०४/०२/२०१२ ने अभिप्राय दिलेला आहे. वेगळा अभिप्राय पुन्हा देण्यांत आवश्यकत्या नाही.

मा.उपायुक्त (सा.) :-प्रस्तावानुसार मा.स्थायी समिती पुढे विषय ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दिनांक ३१/३/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ५मधील स.नं.६४सावेडी येथील ओपन स्पेसमध्ये थिमपार्क (आरोग्य पार्क) निर्माण करणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- प्रभाग क्र.५ मध्ये राबवावयाच्या थीम पार्क बाबत माहिती देण्यांत यावी. हा विषय देखील सावेडी भागाकडीलच आहे. बुरूडगांव, केडगाव कडे अशी योजना का निर्माण केली जात नाही ?

प्र. शहर अभियंता श्री.सातपुते :- अहमदनगर महानगरपालिका सावेडी स.क्र.६४ या जमिनीचे रेखांकन मंजूर असून सदर रेखांकनात ९५०८.०० चौ.मी.जागा आहे. त्यानुसार प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी , जिल्हा नियोजन समिती यांचेकडेस पाठवावयाचा आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- थीम पार्क ही संकल्पना काय आहे. याबाबत माहिती द्यावी.

मा.श्री.लोंढे सु.सो.:- शहरातील इतरही भागात अशाच प्रकारचे प्रकल्प राबविणे बाबत कार्यवाही करावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- केडगांव , बुरूडगांव , येथेही असे प्रकल्प करावे, ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- मा.जिल्हाधिकारी , जिल्हा नियोजन समिती यांचेकडेस प्रस्ताव पाठवावयाचा आहे.ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५ मधील स.नं. ६४ सावेडी येथील ओपन स्पेसमध्ये थिम पार्क (आरोग्य पार्क) निर्माण करणेकामी सावेडी स.नं. ६४ या जमिनीचे रेखांकन मंजुर असुन रेखांकनामध्ये खुली जागा ९५०८.००चौ.मी. इतकी जागा आहे. मा.जिल्हा नियोजन समिती ,अहमदनगर यांचेकडे नाविन्य पुर्ण योजने अंतर्गत प्रस्ताव पाठविणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-३**

विषय क्रमांक-१९ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

ठराव क्रमांक-१९ सोमवार दिनांक ३०/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी डॉ.सौ.कांचन सुरेंद्र रच्चा यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी दरमहा मानधनामध्ये वाढ करून करारबध्द नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा आस्थापना जा.क्र. १३० दि.२३/४/२०१२

प्रस्तावना-विषय- कै.बा.दे. दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी डॉ. सौ. कांचन सुरेंद्र रच्चा यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी दरमहा मानधनामध्ये वाढ करून करारबध्द नियुक्ती करणे बाबत.

मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचे कडील जा.क्र. बा.दे.दवा. व सुतिका गृह ९११ दि.२८/३/२०१२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "डॉ.सौ. कांचन रच्चा यांची वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने सहा महिनयाकरीता नेमणूक करण्यात आलेली आहे. सदरच्या नेमणुकीच्या कालावधी दि.२९/१०/२०११ ते २८/०४/२०१२ असा असुन सदरचा कालावधी दिनांक २८/०४/२०१२ रोजी संपत आहे. सदरच्या कालावधीमधील त्यांचे काम समाधानकारक आहे. पुढील कालावधीतील पुनर्नेमणूक करणे बाबत व सध्या मिळत असलेले रू.१५,०००/- मानधन कमी असुन सदरचे मानधन वाढविणे बाबत विनंती अर्ज त्यांनी केलेला आहे. त्यांच्या विनंती अर्जाचा विचार करता त्यांची शैक्षणिक पात्रता MBBS DGO (स्त्री रोग तज्ञ)अशी असुन त्या दवाखान्यामध्ये दैनंदिन राउंन्ड घेणे, ओ.पि.डी. तपासणी , इमर्जेन्सी डयुटी करणे इत्यादी कामे करतात. तसेच त्या दवाखान्यामध्ये २४ तास ऑन कॉल डयुटीवर असुन त्यांना रविवारी देखील दवाखान्यामध्ये डयुटी करावी लागते. त्यांची शैक्षणिक पात्रता व त्यांच्या कामाचा विचार करता त्यांना सध्या देण्यात येणारे रू.१५,०००/- मानधन अत्यल्प आहे. त्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देउन दि.३०/४/२०१२ ते २९/१०/२०१२ अखेर सहा महिन्या करीता वैद्यकीय अधिकारी या पदावर पुनर्नेमणुकीस व त्यांच्या विनंती अर्जानुसार मानधन वाढविणे शिफारस आहे. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

वरील प्रस्तावावर मा.प्र.आरोग्याधिकारी यांनी त्यांच्या मानधनवाढीचा अर्जावर महानगर पालिकेच्या इतर विभागातील तज्ञांच्या कंत्राटी सेवेच्या पदांवरील मानधनवाढीच्या निर्णयानुसार मा.स्थायी समितीपुढे विषय चर्चेस्तव ठेवणे योग्य असा अभिप्राय नमुद सुचित केलेले आहे.

डॉ.सौ.कांचन रच्चा यांनी दिनांक १३/१/२०१२ रोजीच्या विनंती अर्जामध्ये रू.३५,०००/- इतका दरमहा मानधन वाढी बाबत नमुद केलेली आहे.

तरी कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृहजा.क्र.९११दिनांक २८/३/२०१२च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार डॉ.सौ.कांचन सुरेंद्र रच्चा यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी दिनांक ३०/४/२०१२ते२९/१०/२०१२अखेर सहा महिन्याकरीता अटी व शर्तीनुसार करारबध्द नियुक्तीस व सदर

कालावधीतील दरमहा मानधन किती वाढविणे याबाबत चर्चा विनियम होवुन निर्णयास्तव करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख व सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- डॉ. सौ. कंचन सुरेंद्र रच्चा यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी दरमहा मानधनामध्ये वाढ करून करारबध्द नियुक्ती करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा. श्री. सातपुते दि.ना.:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.डागवाले कि.आ. व मा.श्री. लोंढे सु.सो. :- कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार नेमणुक करण्यांत आलेल्या डॉ.सौ.कांचन रच्चा यांना पहिल्या वेळेस किती मानधनावर नेमणुक करण्यांत आलेली होती.

आस्थापना प्रमुख श्री.अंबादास सोनवणे:- डॉ.सौ.कांचन रच्चा यांची दि.२९/१०/२०११ते २८/०४/२०१२ या कालावधी करीता दरमहा रु.१५,०००/- इतक्या मानधनावर नेमणुक करण्यांत आलेली होती. त्यांनी दिनांक १३/०१/२०१२ रोजी अर्ज करुन सदर मानधन वाढवुन ते रक्कम रु.३५,०००/- करण्यांत यावे. अशी मागणी केलेली आहे.

मा.उपायुक्त(सा)डॉ.डोईफोडे साहेब:- यांच्या मानधन वाढी बाबतच्या प्रस्तावा व्यतिरिक्त इतरही डॉक्टरांचे मानधन वाढी बाबतचा स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्यांत येत आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- महानगरपालिकेत असणा-या सर्व डॉक्टरांचा मानधन वाढीचा प्रस्तावा बरोबर त्यांचा प्रस्ताव एकत्रीत ठेवण्यांत यावा.

मा.सौ. मिसाळ मु.गो.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.कावरे द. ह. :- मानधन वाढीबाबत स्वतंत्र प्रस्ताव लवकर समितीकडे पाठविण्यांत यावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता मानधन वाढीबाबत स्वतंत्र प्रस्ताव तात्काळ समितीकडे पाठविण्यांत यावा. ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठरावः-**अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी डॉ. सौ. कंचन सुरेंद्र रच्चा यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी दि.३०/४/२०१२ते२९/१०/२०१२अखेर सहा महिन्या करीता दरमहा १५,०००/- (रूपये पंधरा हजार फक्त) मानधनावर करारबध्द नियुक्तीस मंजुरी देण्यांत येत आहे.

तसेच वैद्यकीय अधिकारी या पदासाठी मानधन वाढी संदर्भात तातडीने सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा. ऑफिस रिपोर्ट मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.मिसाळ मुक्ता गोपीनाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री.कावरे दत्तात्रय हरिभाऊ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिति
अहमदनगर महानगरपालिका